ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{ Bi-Monthly} Volume-I, Issue-II August 2012

# शोकांतिका

प्रा. डॉ. सुनील म. पवार,
ज. ए. इ. चे महिला महाविद्यालय,
स. वा. जोशी विद्यासंकुल,
डोंबिवली (पूर्व) – 421201.

शोकांतिका (ट्रॅजिडी) बद्दलचे प्रमेय हे ॲरिस्टॉटलप्रणीत मूळ मानले जाते. ट्रॅजिडीबद्दल प्लेटोपासून तर थेट आजपावेतो वेगवेगळ्या विव्दानांनी वेगवेगळी प्रमेये मांडण्याचा प्रयत्न केला असला तरी आजही ॲरिस्टॉटलने मांडलेले ट्रॅजिडीविषयक प्रमेय हेच विशेष करुन प्रमाणभूत समजले जाते.

ट्रॅजिडीसाठी पुढील शब्द वापरतात.

1. शोकांतिका, 2. शोकात्मिका 3. शोकनाट्य आणि 4. शोकात्मनाट्य

1. शोकांतिका म्हणजे शोकपर्यवासी नाटक; ज्या नाटकाचा शेवट (परिणती) शोकात होतो.
2. शोकात्मिका म्हणजे ज्या नाटकाचा आत्मा म्हणजे मनीषा, वातावरण हे केवळ शोकाचे आहे. आणि ज्या नाटकात क्षणोक्षणी केवळ शोक ठसठसत असतो, असे नाटक.
3. त्या नाटकाचा स्थायीभाव शोक आहे. म्हणजेच जे करुणरसप्रधान आहे असे नाटक म्हणते शोकनाट्य.
4. शोकात्मनाट्य म्हणजे ज्यातील नाट्य केवळ शोकामधून उत्पन्न होते व शोक हाच नाटकाचा नाट्यधर्म आहे असे नाटक.

ॲरिस्टॉटलने ट्रॅजिडी, कॉमेडी, महाकाव्य आणि स्तोत्रकाव्य असे वाङ्.मयाचे चार ठळक प्रकार सांगितले आहेत. त्याला वाटते की, व्यवहाराची अनुकृती ही व्यवहारसमांतर, व्यवहारनिम्न अथवा व्यवहारश्रेष्ठ ह्यापैकी कोणत्याही प्रकारची असू शकते. उच्च रुप दर्शविणारी अनुकृती म्हणजे ट्रॅजिडी आणि भ्रष्ट्रुप दाखविणारी ती कॉमेडी, असे त्याला वाटते, ट्रॅजिडीत जीवन समृद्ध दाखविले जाते.

ॲरिस्टॉटलच्या चारही वाड्.मयप्रकारांत ट्रॅजिडी हा सर्वश्रेष्ठ प्रकार आहे. याचे कारण असे की, वाड्.मयातील अनुकृती तालबद्धता आणि प्रमाणबद्धता हे मूलभूत गुणधर्म अवतीर्ण होण्यासाठी संभवनीयतेचे जे आवश्यक तत्व असते ते ट्रॅजिडीइतके इतरत्र कुठेही अटळ नसते.

ॲरिस्टॉटल म्हणतो –

"Tragedy is then an imitation of sublime and complete action ---- it works through pity, terror effecting catharsis of these emotions."

ट्रॅजिडीचे तीन प्रकार आहेत–

1. ग्रीक ट्रॅजिडी, 2. शेक्सपियरियन ट्रॅजिडी आणि इंडियन ट्रॅजिडी

**शोकांतिका :**

'ट्रॅजेडी' या शब्दाची व्युत्पत्ती निश्चित स्वरुपात उपलब्ध नसली तरी ट्रॅगॉस–बगरी, अज या शब्दापासून ट्रॅजेडी हा शब्द व ओघाने नाट्यप्रकार अस्तित्वात आला असावा. ग्रीक समाजात फार पूर्वी म्हणजे इ.स.पूर्व 6/7 शतकात, अजबली देण्याच्या परंपरेच्या समयी, आयोजिल्या जाणाऱ्या नृत्यगायनात्मक विधीमध्ये या नाट्यप्रकाराची सुरुवात असावी असे अभ्यासक मानतात. मुळात केवळ समूहगान असावे, नंतर इ. स. पूर्व सहाव्या शतकाच्या साधारण मध्यात, थेस्पीस या ग्रीक साहित्यिकाने कोरसच्या जोडीला एक/व्यक्ती/नायक त्यात गोवला आणि गानप्रकाराचे नाट्यात रुपांतर झाले. त्यामुळे थेस्पीस हा शोकात्मितेचा प्रणेता समजला जातो. पुढे इ.स.पूर्व पाचव्या शतकात, ग्रीक संस्कृती उत्कर्षास पोचली असताना ह्या नाट्यप्रकाराचे अतिशय समृद्ध असे दर्शन घडते. त्या काळी शोकांतिकेच्या स्पर्धा घेतल्या जात होत्या. त्या काळी इस्लीलसने (इ.स.पूर्व 525 ते 456) रुढ प्रकारात आणखी एका पात्राची भर घातली. अशारितीने नाट्यात संवाद आले आणि संघर्षही. इस्कलीसने चार नाटकांच्या एकत्रित अशा चतुष्टयीची रचना केली सॉफाक्लेजच्या नाट्यरचनेत तंत्राची कलात्मकता व सफाईदारपणा विशेषत्वाने दिसून येतात. इस्किलस व सॉफाक्लेज हे दोघे समकालीन होते. त्याच्यानंतर आलेल्या युरिटीडिसने कथावस्तूत वैविध्य आणले आणि नाट्यरचना व भाषा यात महत्वाचे दल घडवून आणले.

''प्रमुख पात्राचा शोकात्म अंत किंवा विनाश घडवून आणणाऱ्या गंभीर आणि महत्वपूर्ण कृतीचे चित्रण करणारी वाड्.मयीन, विशेषतः नाट्याला कृती म्हणजे 'शोकांतिका अथवा शोकात्मिका'' म्हणतात.

**ॲरिस्टॉटलकृत 'काव्यशास्त्रात' शास्त्रीय विवेचनः—**

'शोकांतिका ही गंभर, स्वयंपूर्ण व विशिष्ट आकारमान असलेल्या कर्माची अनुकृती असते. तिची भाषा प्रत्येक जातीच्या कलात्मक भूषणाने सुशोभित असते, ती नाट्यरुप असते, निवेदात्म नसते आणि ती करुणा वा भीती यांच्या सहाय्याने त्या भावनांचे योग्य ते विरेचन घडवून आणते' अशी व्याख्या ॲरिस्टॉटलने केली आहे.

कारण शोकांतिका ही व्यक्तीची अनुकृती नसून ती एका कर्माची व जीवनाची अनुकृती असते.

ॲरिस्टॉटलने शोकांतिकेचे चार प्रकार सांगितले आहेत ते म्हणजे—

1. **संमिश्र शोकांतिका** — घटनेची परावृत्ती आणि अभिज्ञान यावर अवलूंन असते. उदा. 'एकच प्याला'
2. **दुःखभोगात्मक शोकांतिका** — जिथे विकार ही प्रेरक शक्ती असते. उदा. 'उद्याचा संसार'
3. **नैतिक शोकांतिका** — जिथे हेतू हे नैतिक असतात. उदा. 'नटसम्राट'
4. **साधी शोकांतिका** — निव्वळ दृश्यांत्क घटक असलेली. उदा. 'तोतयाचे बंड'

नाट्य म्हणजे लोकस्वभावाची अनुकृती. पण ही अनुकृती भाव (Emotions) व अवस्था (Situation) यांचीच असते. उदा. एकच प्याला या नाटकात गडकरी एका दारुण अवस्थेचे व त्या अवस्थेतील कारुण्याचे दर्शन घडवितात. त्या कारुण्याची व दारुण अवस्थेची प्रतीती 'सुधाकर' या पात्राव्दारे रसिकांना होते.

माणसाच्या मनावर सारखे विपरीत परिणाम होत गेले की त्याला एकाप्रकारची भ्रमिष्टावस्था प्राप्त होते. या अवस्थेत कित्येकदा मनावरचा ताबा सुटतो तसाच शरिरावरचाही ताबा सुटतो आणि या अवस्थेत कित्येकदा नाशाची बीजे असतात. त्यातही कारुण्य असते त्याची प्रतीती सवाई माधवराव या व्यक्तीव्दारे होते. आत्मकेंद्री व स्वार्थी माणूस कमालीचा पाताळयंत्री बनू शकतो आणि मग तो विघातक अशी कारस्थाने करतो,

कृष्णकृत्ये करतो. त्याच्या कृष्णकृत्यातून प्रतीती येते माणसातल्या दुष्ट प्रवृत्तीची. याचे दर्शन खाडिलकरांनी 'सवाई माधवरावांचा मृत्यू' या नाटकात घडविले आहे.

माणसाचा स्वभाव मानी असला तर त्याला अपमानाचे शल्य फार डाचते. अपमान विषयीच्या अतिविचाराने त्याच्या स्वभावात, कृतीउक्तीत बदल होतो. त्याच्याषी संधंतिधत असणाऱ्या व्यक्तींवर त्याच्या प्रतिक्रिया होतात. सांसारिक जीवनात बिकट प्रसंग निर्माण होतात ही 'लोकवार्ता' आहे आणि लोकस्वभावानुसार पतिपत्नीचे संघर्ष होत राहणार. परंतु राम गणेश गडकरी ह्यांनी कल्पनेतून सिंधूच्या रुपाने अशी स्त्री निर्माण केली की पराकोटीच्या विपत्कालीही तिची शांती ढळत नाही. आणि एकीकडे व्यसनाच्या खोल गर्तेत आत्मनाशाकडेच जाणारा सुधाकर आणि दुसरीकडे येईल त्या विपत्कालाला स्विकारणारी सिंधू यांच्या संबंधातून जे कथानक घडते ते चित्तवेधक ठरते.

माणसाच्या इच्छाषक्तीचा अन्य गूढ शक्तींषी किंवा निसर्गशक्तींषी सतत संघर्ष चाललेला असतो. या संघर्षाचे दर्शन म्हणजेच नाट्य William Archer ने संघर्ष—विवेचनावर विशेष भर दिला आहे.

गूढशक्ती किंवा निसर्गशक्ती माणसांवर काही बंधने लादत असतात. माणसाचे महत्व कमी करत असतात. म्हणूनच संघर्ष उद्‌भवतो. व्यक्तीविरुद्ध नियती. व्यक्तीविरुद्ध समाजसंकेत, व्यक्तीविरुद्ध व्यक्ती, व्यक्तीविरुद्ध व्यक्तीचेच 'स्व' अशी संघर्षाची विविध रुपे सांगता येतील. परंतु हे संघर्षच एकाद्या कथावस्तूला नाट्यरुप देतात. उदा. 'एकच प्याला' या नाटकात 'सुधाकर' हे मुख्य पात्र आहे. आत्मप्रीति असलेल्या सुधाकरची स्वाभिमानाने व मानीपणाने जगण्याची प्रबळ इच्छाशक्ती आहे. इतरांनी त्याचा मत्सर करावा ही जाणीव त्याला संघर्षप्रवृत्त करणारी आहे. कोर्टाची बेअदबी होण्यासारखे वर्तन त्याच्याकडून झाले असेल ते त्यामुळेच. त्याचा 'अपमान' झाला तेव्हा आपली इच्छाशक्ती पराभूत होणार काय या जाणिवेने त्याने अस्वस्थता भोगली. त्या व्यथा विसरण्यासाठी त्याला औषध हवे होते. ते तळीरामने दिले. सुधाकर व्यसनी झाला आणि मग परिस्थितीजन्य अशा घटना एकामागून एक घडू लागल्या. मानाने व स्वाभिमानाने पुनः जगावे, सिंधूला व मुलाला जगवावे ही इच्छाशक्ती पुनः क्षणभर का होईना प्रबळ झाली. निर्वाणीचा प्रसंग निर्माण झाला तो या निर्णयामुळे व्यसनी सुधाकरचा त्याच्या 'स्व'शीच संघर्ष सुरु झाला. हा संघर्ष त्याला आत्मनाषाकडे नेणारा होता. त्यातूनच एक शोकनाट्य (Tragedy) निर्माण झाले.

आपण कसेही असलो तरी पराक्रमी पेशव्यांच्या परंपरेतील आहेत म्हणून पेशवे या नात्याने आपले अस्तित्व टिकले पाहिजे. आपला अधिकार प्रस्थापित झाला पाहिजे ही 'सवाई माधवरावांची' प्रबळ इच्छाशक्ती होती. परंतु नाना फडणीस आणि आईसाहेब त्यांच्या इच्छाशक्तीवर बंधने लादत होती. त्यांचे महत्व कमी करीत होती आणि सवाई माधवराव संघर्षप्रवृत्त होत गेले. परिस्थितिजन्य घटना अशा घडत गेल्या की शेवटी त्यांची इच्छाशक्ती संपूर्णतया पराभूत झाली. आपण पेशवे असतो तरी नानांचे कैदी म्हणून आहोत, आईसाहेबांच्या पहाऱ्यात आहोत, या जाणिवेने त्यांना पछाडले. मग सुरु झाले आत्मक्लेश. स्वतःशीच एक प्रकारचा संघर्ष, आत्मनाशाकडे नेणारा त्यातून 'सवाई माधवरावांचा मृत्यू' हे शोकनाट्य निर्माण झाले.

शोकांतिका केवळ उल्हासित करित नाही, ती व्याकूळ करुन सोडते. सारे काही उध्दवस्त झाल्याचा, अवघे उजाड झाल्याचा, सर्वस्वाचा सर्वनाश झाल्याचा थेट अंतःकरणाला जाऊन भिडणारा अनुभव ती साकार करते. त्यामुळे मनात विषाद दाटून अंतःकरणाला जाऊन भिडणारा अनुभव ती साकार करते, डोळ्यात अश्रू उभे राहतात, जे लयाला गेले त्याबद्दलची खंत व करुणा जागी होते. आणि त्याच वेळी काही विशिश्ट भावनेने काही विशिश्ट ध्येयाला वाहून घेऊन एकाकी वाटचाल करणाऱ्या जीवांची चरित्रे एक वेगळाच उदात्त संस्कार करुन जातात.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

1. रुप–निरुपण : डॉ.देशपांडे शिरिष गोपाळ
2. लोकसाहित्याची रुपरेषा : भागवत दुर्गा
3. लोकसाहित्याचे अंतःप्रवाह : मांडे प्रभाकर
4. संज्ञा–समीक्षा कोष, खंड 4 : विजया राजाध्यक्ष (संपादक)
5. सांस्कृतिक कोष : संपादकिय
6. आरती संग्रह